आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातमीपत्र
सकाळी 07 वाजून 10 मि.

दिनांक : 11.11.2026 **वार : बुधवार**

---

1. पोलिसांनी संवेदनशीलतेनं काम करत लोकाभिमुख दृष्टिकोन ठेवावा-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं आवाहन
2. राज्यात आजपासून 18 नोव्हेंबर पर्यन्त जनजातीय गौरव सेवा सप्ताहाचं आयोजन
3. गोकुळच्या अध्यक्षपदी महायुतीचे राजेश पाटील यांची निवड
4. दिवाळी पाडव्याचा सण राज्यात सर्वत्र उत्साहात साजरा आणि
5. 19 वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट मध्ये भारत उपांत्य फेरीत दाखल

राष्ट्रपती

पोलिसांनी संवेदनशीलतेनं काम करावं तसंच लोकाभिमुख दृष्टिकोन ठेवून सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या समस्या आणि तक्रारींचं प्राधान्यानं निराकरण करावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. भारतीय पोलीस सेवेच्या 2025 च्या तुकडीतील प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना संबोधित करतांना दिल्लीत राष्ट्रपती भवन इथे त्या काल बोलत होत्या. नागरिकांची सेवा करण्याची बांधिलकी पोलिसांमध्ये असायला हवी असं सांगत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत पोलीस यंत्रणेनं नेहमी अग्रेसर राहण्याची गरजही राष्ट्रपतींनी अधोरेखित केली.

बिरसा मुंडा

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आजपासून 18 नोव्हेंबर पर्यन्त जनजातीय गौरव सेवा सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. आदिवासी समाजातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवणं आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणं हा या सप्ताहाचा उद्देश आहे. आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकांची स्वच्छता, सुशोभीकरण आणि वेरूळ इथे दीपोत्सवाने त्यांच्या ऐतिहासिक योगदानाला अभिवादन देखील केलं जाणार आहे. यानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथे मुख्य शासकीय गौरव कार्यक्रमाने सप्ताहाचा समारोप होईल.

डिजिटल प्लॅटफॉर्म

देशातील डिजिटल अरेस्ट घोटाळे आणि संबंधित सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी प्रस्तावित प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती सादर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं व्हॉट्सॲपसह अन्य डिजिटल मध्यस्थ कंपन्यांना दिले आहेत. सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठानं या संदर्भातील माहिती भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राकडे सादर करण्यास सांगितलं आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी येत्या 23 नोव्हेंबरला होणार आहे.

गोकुळ-कोल्हापूर

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ-गोकुळच्या अध्यक्षपदाच्या निवडीत महायुतीनं बाजी मारली आहे. काल झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत महायुतीचे संचालक - चंदगडचे माजी आमदार राजेश पाटील यांची अध्यक्षपदी निवड झाली. त्यांनी समविचारी आघाडीचे उमेदवार संचालक शशिकांत पाटील चुयेकर यांचा 16 विरुद्ध 13 मतांनी पराभव केला. निवडणूक निर्णय अधिकारी मौसमी चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ही निवडणूक पार

पडली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शिरगाव इथल्या गोकुळ दूध प्रकल्प परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

जल व्यवस्थापन

भारताचं जलव्यवस्थापन विकसनशील देशांसाठी आदर्श ठरत असल्याबद्दल जागतिक बँकेचे जलविषयक जागतिक संचालक सरोज कुमार झा यांनी कौतुक केलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आगामी जल परिषदेसंदर्भात बोलतांना झा यांनी जलजीवन मिशन, नमामि-गंगे आणि स्वच्छ भारत अभियान अशा महत्त्वपूर्ण उपक्रमांचं विशेष कौतुक केलं. जल जीवन अभियानाच्या माध्यमातून सात वर्षांपेक्षा कमी कालावधीत 80 कोटी नागरिकांना चांगल्या पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्याचं त्यांनी नमूद केलं. भारतानं जलव्यवस्थापनाच्या क्षेत्रातील आपले अनुभव आणि यशोगाथा जागतिक स्तरावर इतर देशांसमोर मांडावेत, असं आवाहन झा यांनी केलं. संयुक्त राष्ट्रांची 2026 मधील जल परिषद 8 ते 10 डिसेंबरदरम्यान अबूधाबी इथे होणार आहे.

बालसंजीवनी अभियान

राज्यातील ऊसतोड मजूरांच्या बालकांची विशेष आरोग्य तपासणी करण्याचे निर्देश आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी दिले आहेत. त्यासाठी आरोग्य विभागाचं 'बालसंजीवनी' हे विशेष अभियान राबवलं जाणार आहे. राज्यातील ऊस कारखाना परिसर, ऊसतोड शेती परिसर अशा ठिकाणी जाऊन बालकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ऊसतोड कारखान्यांच्या गाळप हंगामामध्ये या मजुरांसोबत त्यांची अल्पवयीन मुलंही मोठ्या संख्येनं असतात. त्यांना आवश्यक त्या आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

साखर

राज्यात 2026-27 च्या ऊस गाळप हंगामाच्या सुरुवातीलाच साखर उताऱ्यात घट झाल्याचं चित्र असून साखर आयुक्तालयाच्या अहवालानुसार, राज्यातल्या विभागांमध्ये साखरेचा उतारा 7 ते 9 टक्क्यांच्या दरम्यान नोंदवण्यात आला आहे. साखरेची संभाव्य टंचाई आणि दुष्काळी परिस्थितीमुळे राज्यात यंदा 15 ऑक्टोबरपासून ऊस गाळप हंगाम सुरू करण्याचे आदेश सरकारनं कारखानदारांना दिले होते. हवामानातील चढ-उतार, ऊसाची परिपक्वता, तसंच ऊसतोडीची वेळ या प्रमुख घटकांचा साखर उताऱ्यावर परिणाम होत असल्याचं मानलं जात आहे.

क्षयरोग

राज्यात क्षयरोगाचं जलद निदान करण्यासाठी 300 अत्याधुनिक 'टूनॅट क्वात्रो' यंत्रं बसवण्यात येणार आहेत. यासाठी 41 कोटी 92 लाख रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात आला असल्याची माहिती राज्याच्या आरोग्य विभागानं दिली आहे. राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत आगामी 21 महिन्यांत प्राथमिक आरोग्य केंद्रं, ग्रामीण रुग्णालयं आणि जिल्हास्तरीय आरोग्य संस्थांमध्ये ही यंत्रं बसवण्यात येतील. या यंत्रांद्वारे औषधांना प्रतिसाद न देणाऱ्या क्षयरोगाचंही एका तासात निदान शक्य होणार आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी एकंदर नऊ लाख 36 हजार चाचण्या करणं शक्य होणार आहे.

सैनिकांप्रती कृतज्ञता-परभणी

परभणीतील माणुसकी प्रतिष्ठानच्या वतीनं सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी परभणी आंतरराष्ट्रीय सायन्स पार्क इथे सैनिक कृतज्ञता सोहळा उपक्रमाअंतर्गत सैनिकांच्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी करण्यात आली. यावेळी या उपक्रमाबाबत आपल्या भावना व्यक्त करताना, हवालदार अर्जुन शेंडगे म्हणाले.....

माझ्या सतरा वर्षाच्या सर्व्हिस च्या कॅरियर मध्ये माझी ही पाचवी दिवाळी असेल म्हणजे घरी साजरी झाली. त्याच्या सोबतची जी दोन दिवाळी आहे माझी या ठिकाणी ह्यांच्या सोबत साजरी करतोय मी तर या दोन दिवाळीमध्ये जे ए नी आयोजन केलं होतं. खूप चांगल्या प्रकारे केलं आणि असे जे सैनिकाविषयी जे आयोजन करतात ना तर ह्याच्यामध्ये एक ऊर्जा निर्माण होते, आणि ही जी स्प्रिट मिळते आम्हाला एकदम ग्लुकोज च काम करते आणि या पद्धती, आम्हाला जे कामामध्ये आहे ना डबल एनर्जी येते आणि आम्ही आणखी चांगल्या पद्धतीने ड्युटी करायला एक एनर्जी निर्माण होते आणि हा जे कार्यक्रम झाला आणि आम्हाला सर्व सैनिकांना बोलावलं आणि ही जे सर्वांनी जे तुम्ही आम्हाला ट्रॉफी देऊन सन्मान देऊन सन्मानित केलं हे सगळं श्रेय मी जे सैनिक सुट्टीवर येऊ शकले नाहीत किंवा ते काही कारणास्तव दीपावळीला घरी आपल्या येऊ शकले नाहीत हे त्यांना मी समर्पित करतो.

गोवर्धन पूजा

कार्तिक शुद्ध प्रतिपदा अर्थात बलिप्रतिपदेचा सण काल सर्वत्र, उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्त राज्यातील विविध मंदिरांमध्ये अन्नकूट तसंच गोवर्धन पूजा करण्यात आली. व्यापारी वर्गाच्या नव्या वर्षाला या मुहुर्तावर प्रारंभ होतो. पती-पत्नीच्या नात्यातील गोडवा वृद्धींगत करणारा सण म्हणूनही पाडवा विशेष महत्त्वाचा मानला जातो. उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोवर्धन पूजेनिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची काल मुंबईत लोकभवन, इथे भेट घेऊन त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

भाऊबीज

आज कार्तिक शुद्ध द्वितीया म्हणजेच भाऊबीज, दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणजे भाऊबीज. आज राज्यात भाऊबीज उत्साहात साजरी होत आहे.

रेड्यांची मिरवणूक-नाशिक

नाशिकमध्ये बलिप्रतिपदेनिमित्त काल ढोल ताशांचा गजरात आणि आकर्षक फटाक्यांची आतषबाजी करून रेड्यांची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत दुग्ध व्यवसायिक, भाविक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते. अनेक रेड्यांवर कुंभमेळा संदेश रेखाटण्यात आले होते.

गंगोत्रीधाम

चारधाममध्ये गंगोत्री धामचे दरवाजे हिवाळ्यानिमित्त कालपासून बंद करण्यात आले. दुपारी अन्नकुट उत्सव झाल्यानंतर हे दरवाजे बंद करण्यात आले.

सिद्धिविनायक गणपती

राज्यातील दुष्काळग्रस्त परिस्थितीत संकटग्रस्त बळीराजाला मदत करण्याच्या हेतूनं मुंबईच्या श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाच्या वतीनं मुख्यमंत्री सहाय्यता निधीला 10 कोटी रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी मंदिर न्यासाचे अध्यक्ष सदा सरवणकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

ढोलेबुवा निधन

कराडकर पठडीतील ज्येष्ठ कीर्तनकार कीर्तनाचार्य श्रीपाद रामकृष्ण ढोले बुवा यांचं काल रात्री रत्नागिरी इथे निधन झालं. ते 89 वर्षांचे होते. किर्तन सेवेसाठी कर्नाटकातला श्रृंगेरी पिठाचा पुरस्कार, गोवा राज्य पुरस्कार यांच्यासह अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं होतं.

19 वर्षांखालील क्रिकेट

19 वर्षांखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या सामन्यात, भारताने संयुक्त अरब अमिरातीचा 70 धावांनी पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. सुरुवातीला भारताने 50 षटकांत 7 गडी गमावून 309 धावा केल्या. मात्र संयुक्त अरब अमिरातीने 50 षटकांत 239 धावाच केल्या. आर्यवीर सेहवागने 168 चेंडूंत 160 धावांची शानदार खेळी केली, त्याला 'सामनावीर' म्हणून घोषित करण्यात आलं. उद्या होणाऱ्या उपांत्य फेरीत भारताचा सामना अफगाणिस्तानशी होईल.

क्रिकेट

दरम्यान भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तिसरा एकदिवसीय क्रिकेट सामना काल पावसामुळे रद्द करण्यात झाला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पाच सामन्यांच्या मालिकेत भारत 2-0 ने आघाडीवर आहे.

हवामान

राज्यात उद्या सकाळपर्यंत हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून काल सर्वात कमी किमान तापमान जळगाव इथे 13 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.